# प्रेस नोट दि.१८/०७/२०२२

## गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड

**गुन्हे शाखा, युनिट-४ कडुन विधिसंघर्षित बालक यांचे समुपदेशन करणेकामी मेळावा आयोजित केलेबाबत**

**गुन्हे शाखा, युनिट-४,** पिंपरी चिंचवड यांचे मार्फतीने पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील बालगुन्हेगारीस आळा घालण्याचे उद्देशाने **विधिसंघर्षित बालक यांचे समुपदेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता,** सदर कार्यक्रमाकरीता समुपदेशक **श्री. सुभाष औरादकर, संस्थापक अध्यक्ष - जीवन विकास फाउंडेशन व श्री. विल्यम साळवी संस्थापक अध्यक्ष - विमल फाउंडेशन** यांनी विधीसंघर्षित बालकांना १) गुन्हेगारी पासुन प्रवृत्त करणे २) करीयर बाबत ३) व्यसनमुक्ती इ. बाबत मार्गदर्शन केले, सदर कार्यक्रमास ७० ते ८० विधीसंघर्षित बालक व त्यांचे पालक तसेच युनिट-४ कडील सर्व अधिकारी अंमलदार तसेच पोलीस आयुक्तालयाच्या विशेष बाल पोलीस पथकाचे पोलीस उप निरीक्षक निकम व त्यांचे पथकातील अंमलदार असे उपस्थित होते.

दिनांक ०५/०७/२०२२ रोजी युनिट-४ चे हद्दिमध्ये पहाटेच्या वेळी उघड्या दरवाजावाटे होणाऱ्या चोऱ्यांना प्रतिबंध व्हावा या उद्देशाने युनिट-४ चे हद्दितील वाकड पोलीस स्टेशन अंतर्गत शिव कॉलनी वाकड रोड, वाकड पुणे येथील बॅचलर मुले मुली राहत असलेल्या सोसायट्यांमध्ये मिटींग आयोजित करुन त्यांना तसेच सोसायटीचे चेअरमन हजर होते.

दिनांक १५/०७/२०२२ रोजी हिंजवडी पोलीस स्टेशन हद्दिमध्ये मुकाईनगर, हॉटेल मेझा नाईन चे पाठिमागे असणाऱ्या एकुण ०७ पी.जी. मध्ये राहणारे एकुण ४५ ते ५० मुले मुली यांची मिटींग आयोजित केली होती.

तसेच दिनांक १७/०७/२०२२ रोजी हिंजवडी पोलीस स्टेशन हद्दिमध्ये ब्ल्यु रिच सोसायटी, फेज १ हिंजवडी पुणे या सोसायटीमध्ये राहणारे एकुण ७० ते ८० रहिवाशी यांची मिटींग आयोजित केली होती.

उपरोक्त आयोजीत मिटींग दरम्यान रहिवाशी/भाडेकरु, पेईंग गेस्ट यांना गुन्हे घडु नये यासाठी काय दक्षता घ्यावी ? याबाबत मार्गदर्शन केले. जबरी चोरी, घरफोडी चोरी, वाहन चोरी, सायबर क्राईम तसेच सकाळी उघडया दरवाज्यावाटे होणाऱ्या चोऱ्या होऊ नये याकरीता काय दक्षता घ्यावी याबाबत सुचना दिल्या.

**(डॉ. काकासाहेब डोळे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड